सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन — सैनिक कल्याण विभाग**

**छात्रपुर्व प्रशिक्षण केंद्र**

**विभागीय आयुक्त कार्यालय परिसर,नाशिक रोड, नाशिक - 422101**

**ईमेल आय डी : training.pctcnashik@gmail.com** **दूरध्वनी क्र. : 0253-2451032**

---

क्र. 2566/ससा/छाप्रके-3 दिनांक: 22 मे 2023

प्रति,

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी
जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय
सर्व जिल्हे **(ई-मेलव्दारे)** ______________

**विषय : छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे चालणाऱ्या सी. डी. एस. प्रशिक्षण वर्ग क्र. 61 बाबत**

संदर्भ : विभागाचे पत्र क्र. 19008/सैकवि-19 दिनांक 16 एप्रिल 2010 आणि मा. संचालक, सैकवि, पुणे यांचे अर्धशासकीय पत्र क्र. 19008/सैकवि-19 दिनांक 28 डिसेंबर 2010.

1. उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे महाराष्ट्रीयन नवयुवक व नवयुवतीं साठी **CDS** कोर्स क्र. 61 चालविण्यासाठी मा. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांची मंजुरी मिळाली असुन केंद्रामध्ये तसे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा तपशिल खालील नमूद प्रमाणे आहे :-

| अ. क्र. | तपशिल | कालावधी/दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | कोर्सचे नांव व क्रमांक | **CDS कोर्स क्र. 61** | |
| 2. | कोर्स कालावधी | **दिनांक 19/06/2023 ते 01/09/2023 (75 दिवस)** | |
| 3. | निवड केलेल्या प्रशिक्षणार्थीची यादी **E-Mail** व्दारे केंद्रास पोहचण्याची अंतिम तारीख | **दि.** 15/06/2023 | |

2. जिल्हयास दिलेल्या प्रशिक्षणार्थी निवडीच्या उदिष्टाबाबत विभागाच्या संदर्भीय पत्रांमध्ये दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

---- 2 /-

3. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींना त्यांनी सोबत आणलेले प्रवेश पत्राची पडताळणी आणि प्रतिस्वाक्षरी करुन देण्यात यावे व केंद्रामध्ये येताना सोबत इयत्ता दहावी ते पदवी पर्यंतची सर्व मुळ प्रमाणपत्रे सोबत घेऊन येणेबाबत त्यांना अवगत करण्यात यावे. मुळ प्रमाणपत्रे कोर्सच्या कालावधीमध्ये सुरक्षा जमानत म्हणून केंद्रात ठेवण्यात येतील. तसेच प्रशिक्षणार्थी जिल्हयामध्ये मुलाखतीस येते वेळी त्यांनी **Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईट** **www.mhasainik.maharashtra.gov.in** **या संकेतस्थळावर जाऊन (Other -PCTC Nashik cds-** ६१) **कोर्ससाठी संबंधीत या परिशिष्टांची प्रिंट काढून व ते पुर्ण भरुन सोबत घेऊन जावे. प्रवेशपत्राची** आणि **परिशिष्टांची Check List** आणि महत्वाच्या **तारखां नुसार** तपासणी करण्यात यावी. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींना दिनांक 18 **जून** 2023 रोजी **सकाळी** 10.00 वाजता छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, वर्ग-2 अंधिकारी निवासस्थाने, नाशिक रोड, नाशिक येथे हजर होणे बाबत अवगत करण्यात यावे.

4. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींची यादी **(PDF File)** मध्ये दिनांक 15 जून 2023 पर्यंत ई-मेल व्दारे केंद्रास पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी ही विनंती .

5. सोबत जिल्हयाने प्रसिध्दीस द्यावयाचे बातमीपत्र व प्रसिध्दीस द्यावयाच्या बातमीपत्राच्या कार्यवाहीची निर्धारीत कार्यपध्दती जोडण्यात येत आहे.

लेफ्टनंट कर्नल सोनवणे विलास शंकर (निवृत्त)
प्रभारी अधिकारी
छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र,
नाशिक रोड, नाशिक

<u>सोबत</u> : वरीलप्रमाणे.

प्रति,

मा. संचालक
सैनिक कल्याण विभाग (महाराष्ट्र राज्य)
रायगड इमारत, राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर
सोलापूर रोड, घोरपडी, पुणे - 411 001

- माननियांचे माहितीस्तव सविनय सादर. तसेच **विभागाच्या वेब साईटवर** पेज वर **Department of Sainik Welfare, Pune(DSW) वर उपलब्ध करण्याची विनंती करण्यत येत आहे.**

# बातमीपत्र

## भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुर्वणसंधी

संघ लोक सेवा आयोग (UPSC), नवी दिल्ली यांचे मार्फत कोणत्याही शाखेच्या पदवीधर उमेद्वारासाठी दिनांक 03/09/2023 रोजी घेण्यात येणा-या कंम्बाईन्ड डिफेन्स सर्व्हिसेस (CDS) या संरक्षण दलातील अधिकारी पदाच्या परिक्षेकरिता दिनांक 19/05/2022 रोजीच्या एम्प्लॉयमेंट न्यूज (रोजगार समाचार) मध्ये जाहिरात प्रसिध्द झाली होती. संघ लोक सेवा आयोगाकडे ऑनलाइन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक 06/06/2023 अशी होती. ऑन लाईन फॉर्म भरणेसाठी **www.upsconline.nic.in** या वेबसाईटचा वापर करावा. कंम्बाईन्ड डिफेन्स सर्व्हिसेस (CDS) या परिक्षेद्वारा कायमस्वरुपी व अल्पमुदतीचे कमीशन साठी निवड करण्यात येते.

कंम्बाईन्ड डिफेन्स सर्व्हिसेस (CDS) या परिक्षेची पूर्व तयारी करून घेणेसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतींसाठी दिनांक 19/06/2023 ते दिनांक 01/09/2023 या कालावधीत CDS कोर्स क्रमांक 61 चे आयोजन करण्यात येत आहे. **सदर कोर्ससाठी प्रशिक्षणार्थींची निवास, भोजन आणि प्रशिक्षणाची नि:शुल्क सोय करण्यात आलेली आहे.**

तरी_______________जिल्हयातील इच्छुक उमेद्वारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय-______________ येथे दिनांक ____/06/2023 रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी **Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईट** www.mhasainik.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर जाऊन (Other -PCTC Nashik CDS -61) कोर्ससाठी संबंधीत या परिशिष्टांची प्रिंट काढून व ते पुर्ण भरुन सोबत घेऊन जावे.**

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा दुरध्वनी क्रमांक 0253-245032 वर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष किंवा दुरध्वनीवरून संपर्क करावा असे अवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी________________ यांनी केले आहे.

**जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी**

______________

f:\pctc nashik\email 27 apr 2023 information ssb cds exam details year 2023\press notification and adv for all zswos for wide publicity\email 23 may 2023 info for zswo for publicity letter cds 61.doc

**छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे आयोजित केल्या जाणाऱ्या CDS/SSB कोर्सबाबत जिल्हयाने प्रसिध्दीस द्यावयाच्या बातमीपत्राची कार्यवाहीची निर्धारीत कार्यपध्दती**

1. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचेकडून **CDS/SSB** कोर्सबाबत, कोर्स कालावधी, कोर्स क्रमांक, कोर्स सुरु होण्याचा दिनांक आणि कोर्स समाप्तीचा दिनांक **Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईट www.mhasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन** (Other -PCTC Nashik-CDS-61) **कोर्ससाठी संबंधीत या परिशिष्टांची प्रिंट काढून व ते पुर्ण भरुन सोबत घेऊन जावे.**सोबत जोडलेल्या बातमीपत्रानुसार प्रत्येक कोर्ससाठी बातमीपत्र तयार करुन ते स्थानिक वर्तमानपत्र, आकाशवाणी आणि चलचित्र वाहिनी इत्यादी यंत्रणेना प्रसिध्दीस देण्यात यावे.

2. सर्व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांनी खात्री करावी की कोर्स बाबत कोणत्याही प्रकारची माहिती उमेदवाराने कार्यालयास भेट देऊन किंवा दूरध्वनी वरुन विचारणा केली असता **Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईट** www.mhasainik.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर जाऊन** (Other -PCTC Nashik CDS-61) **कोर्ससाठी संबंधीत या परिशिष्टांची प्रिंट काढून व ते पुर्ण भरुन सोबत घेऊन जावे.**

3. उमेदवार पात्र आहे किंवा कसे याबाबत खात्री करुनच त्याची प्रशिक्षणासाठी निवड करण्यात यावी. निवड केलेल्या उमेदवारांनी सोबत आणलेल्या संबधित परिशिष्टांवर प्रतिस्वाक्षरी करण्यात येऊन त्यांना छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे नमूद तारखेस हजर होणेबाबत अवगत करण्यात यावे.

---***---***---***---

f:\pctc nashik\email 27 apr 2023 information ssb cds exam details year 2023\press notification and adv for all zswos for wide publicity\email19 may 2023 info for zswo for publicity letter cds 61.doc

# CHECK LIST

**For Candidate's intending to attend CDS/SSB course at Pre Cadet Training Centre, Nashik Road**

| अ.क्र. | परिशिष्ट क्र. | तपशिल |
|---|---|---|
| 1. | - | प्रवेश पत्र |
| 2. | 'अ' | वैयक्तिक माहिती |
| 3. | 'ब' | केंद्रातील निवासस्थानात प्रशिक्षणार्थींना वास्तव्यास असतांना पाळावयाचे नियम व अटी |
| 4. | 'क' | सोबत आणावयाचे कपडे, साहित्य , शैक्षणिक प्रमाणपत्रे आणि केंद्रातून दिले जाणारे सामान |
| 5. | 'ड' | पालकांचे संमतीपत्र |
| 6. | 'इ' | Medical Fitness Certificate |
| 7. | 'ई' | Bond **(करारनामा)**<br>**स्टँप पेपरची आवश्यकता नाही.** |

दूरध्वनी क्र.
email :

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय

______________________

दिनांक : 2023

प्रति,

______________________
______________________
______________________

**विषय : सी.डी.एस. प्रशिक्षण वर्ग क्र. 61 करीता : प्रवेश पत्र**

1. आपली निवड सी.डी.एस. प्रशिक्षण वर्ग क्र. 61 साठी करण्यात आलेली आहे. प्रशिक्षण वर्ग दिनांक 19/06/2023 ते दिनांक 01/09/2023 पर्यंत छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे सुरु होत आहे. आपण प्रशिक्षणासाठी दिनांक **18 जून 2023** रोजी **सकाळी** 10.00 वाजता केंद्रात विनाविलंब हजर रहावे.

2. सोबत जोडलेले पालकांचे संमतीपत्रक पालकांना दाखवून त्यांचे सहमतीने/स्वाक्षरी घेऊन तसेच शासकीय रुग्णालयातून वैद्यकिय फिटनेस प्रमाणपत्र सोबत घेऊन प्रशिक्षणास हजर रहावे.

3. प्रशिक्षणार्थींची प्रवेशपूर्व परिक्षा छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रात घेण्यात येईल व त्याच्या निकालावर प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात येईल.

4. केंद्रामध्ये निवास, भोजन व प्रशिक्षणाची विनामुल्य सोय शासनातर्फे केली आहे. तसेच केंद्रामध्ये देण्यात येणारे प्रशिक्षण हे मार्गदर्शन व परिक्षेची पुर्व तयारी करण्याकरीता आहे याची नोंद घ्यावी.

5. प्रशिक्षणासाठी येण्याचा व जाण्याचा तसेच खाजगी खर्च स्व:त करावा लागेल. तसेच प्रशिक्षणासाठी येताना कोणतेही वाद्य, कॅमेरा, टेपरेकॉर्डर, भ्रमणध्वनि, रेडीओ, अंगठी, लॉकेट तसेच गरजेपेक्षा जास्त किंमती सामान आणू नये.

6. प्रशिक्षण कालावधीत कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास किंवा मध्येच प्रशिक्षण सोडल्यास शासकीय नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येईल व प्रशिक्षण वर्गातून काढून टाकण्यात येईल. तसेच प्रशिक्षण कालावधीत कोणत्याही कारणासाठी सुटी देता येणार नाही. (फक्त संरक्षण दलातील परिक्षेसाठी किंवा Except Emergency वगळुन).

7. प्रशिक्षण केंद्र हे नाशिक रोड रेल्वे स्टेशन पासून एक किलोमिटर इतके अंतरावर असून विभागीय आयुक्त कार्यालयाच्या आवारात व भारत प्रतीभूती मुद्रणालय (ISP), नाशिक रोड च्या समोर आहे.

8. हे प्रवेश पत्र आपणास मिळाल्यावर दिलेल्या तारखेस वेळेवर केंद्रात हजर रहावे अन्यथा प्रवेश रद्द होईल.

गोल शिक्का
सही व शिक्का

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी

______________________

सोबत : **परिशिष्ट 'अ' ते परिशिष्ट 'इ'**

f:\pctc nashik\email 27 apr 2023 information ssb cds exam details year 2023\press notification and adv for all zswos for wide publicity\email 23 may 2023 info for zswo for publicity letter cds 61.doc

परिशिष्ट 'अ'

# वैयक्तिक माहिती

फोटो

1. नांव (पुर्ण) :

2. लिंग :

3. जन्म तारीख :

4. धर्म/जात :

5. पत्ता पिन कोड नंबर सहीत :

6. मोबाईल नंबर : Email Id :

7. आई/वडील यांचा मोबाईल नंबर :1. वडील_______________2. आई/भाऊ____________ (आई / वडील हयात नसतील तर पालकांचे नांव व मो.नंबर पाल्याच्या नात्यासह नमूद करावा).

8. आधार कार्ड नंबर :
( सोबत छायांकित प्रत जोडावी ).

9. शैक्षणिक माहिती :

| Qualification | Name of Board | Year in which exam passed | Marks obtained in % |
|---|---|---|---|
| SSC Exam | | | |
| HSC Exam | | | |
| Graduation | | | |
| Others | | | |

10. N.C.C. परीक्षा पात्र असल्यास त्याची माहिती :

11. CDS Exam Number :

12. शाखेसाठी प्रवेश (IMA/OTA/AFA/INA) :

**प्रशिक्षणार्थी स्वाक्षरी** _______________

f:\pctc nashik\email 27 apr 2023 information ssb cds exam details year 2023\press notification and adv for all zswos for wide publicity\email19 may 2023 info for zswo for publicity letter cds 61.doc

# छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक

## केंद्रातील निवासस्थानात प्रशिक्षणार्थींना वास्तव्यास असतांना पाळावयाचे नियम व अटी

1 छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथील प्रशिक्षण केंद्र हे नि:शुल्क असुन कोणीही, कुणालाही, कोणत्याही प्रकारचे शु:ल्क देवू नये.

2. प्रशिक्षणार्थी निवासकक्ष, भोजनालय, प्रशिक्षण वर्ग आणि आवार स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकावर राहील. तसेच येथील भिंतीवर लिखाण/ रेघोटया/ चित्र काढून विद्रूप करु नये व वस्तुंची तोडफोड करण्यात येवू नये तसे केल्यास त्याची भरपाई करुन घेण्यात येईल.

3. बाथरुम, शौचालय व कपडे स्वच्छ करण्यासाठी पाण्याचा योग्य व जपून वापर करावा. बाथरुम मधील पाणी पिण्यासाठी वापरु नये. निवास कक्ष, भोजनालय व प्रशिक्षण वर्गातील पंखे व लाईटचा योग्य आणि गरजेनुसार वापर करावा. लाईटवर चालणारी ईस्तरी किंवा इतर उपकरणे वापरु नयेत.

4. प्रशिक्षणार्थीची अचानक तब्बेत बिघडल्यास तात्काळ डयूटी प्रशिक्षक / महिला सहाय्यक यांना कळविण्यात यावे.

5. केंद्रात धुम्रपान किंवा मद्यपान करण्यास सक्त मनाई आहे तसे आढळल्यास संबधित प्रशिक्षणार्थीवर दंडात्मक कार्यवाही करुन प्रशिक्षण केंद्रातून काढण्यात येईल.

6. शारिरीक तसेच कवायत प्रशिक्षण वर्ग आणि प्रशिक्षण वर्गात असतांना योग्य गणवेषात असणे आवश्यक आहे.

7. प्रशिक्षण वर्ग सुरु असतांना प्रशिक्षणार्थीनी निवासकक्ष बंद करुन सदर निवासकक्षाच्या कुलपाची किल्ली प्रमुखाकडे असणे आवश्यक आहे. तसेच **निवासकक्ष बंद करतेवेळी त्यामधील लाईट व पंख्यांची बटने बंद केली आहेत याची खात्री करुन त्यानंतर निवासकक्ष बंद करण्यात यावा.**

8. प्रशिक्षणार्थीची प्रशिक्षणकक्ष, निवासकक्ष, भोजनालय, मनोरंजन कक्ष आणि खेळ प्रतिनिधी या पदांवर नेमणूक झाल्यावर त्या पदाच्या जबाबदारीचे काटेकोरपणे पालन करावे.

9. प्रशिक्षणार्थी निवासस्थान आवाराचे बाहेर जाण्यापूर्वी परवानगी घेणे (आउट पास) आवश्यक आहे.

10. प्रशिक्षणार्थीनी बाहेरील बाजारातील उघडयावरील अन्नपदार्थ खावू/सेवण करु नयेत.

11. प्रशिक्षणार्थी निवासस्थानाचे आवारात, भोजनालय, प्रशिक्षणवर्ग आणि परिसरात कसल्याही प्रकारचे गैरवर्तणूक होता कामा नये तसे झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

12. योग्य कारणाशिवाय लेखी अर्ज देऊन त्यावर परवानगी घेतल्या शिवाय स्वत:चे गावी किंवा इतर कोठेही बाहेरगांवी जाण्यास परवानगी मिळणार नाही.

13. रात्री 10.00 वाजले नंतर प्रशिक्षण केंद्राच्या निवासाचा मुख्य लोखंडी दरवाजा बंद झाल्या नंतर बाहेर जाण्यास सक्त मनाई आहे.

14. प्रशिक्षणार्थी निवासस्थानाचे आवारात, भोजनालय, प्रशिक्षण वर्ग आणि परिसरात लुंगी, बनियान, अंडरविअर व टॉवेल घालून फिरणे सक्त मना आहे.

15. प्रशिक्षणार्थी भोजन ठेकेदार अथवा त्यांचे कर्मचा-यां सोबत तक्रार अथवा हुज्जत घालू नये. भोजन करताना शांतता पाळावी तसेच जेवणासंबधी तक्रार असल्यास भोजन प्रतिनिधी/प्रशिक्षक/भांडारपाल किंवा प्रभारी अधिकारी यांचेकडे तक्रार नोंद करावी.

16. प्रशिक्षणार्थींना सकाळचा नाश्ता, दुपारचे भोजन आणि रात्रीचे भोजन योग्य गणवेषातच, भोजनगृहात घ्यावयाचे आहे. प्रशिक्षणार्थींना निवास कक्षात भोजन घेवून जाणेस सक्त मनाई आहे.

17. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे प्रशिक्षणार्थींनी प्रवेश घेतल्यानंतर प्रशिक्षण कालावधी पुर्ण करणे बंधनकारक आहे. प्रशिक्षण अर्धवट सोडून दिल्यास करारनाम्यानुसार शासकीय दंड तसेच झालेल्या भोजन व निवास खर्चाची पुर्ण भरपाई करावी लागेल.

18. प्रशिक्षण केंद्रातुन मिळालेले साहित्य कोर्स समाप्ती नंतर स्वच्छ धुऊन/दुरुस्त करुन ते सुव्यवस्थीत जमा करावे.

19. प्रशिक्षण केंद्राच्या आवारात फक्त विद्यार्थ्यांच्या पालकांना पूर्व परवानगीने प्रवेश देण्यात येईल व पालकांना भेटण्यासाठी मनोरंजन कक्ष उपलब्ध केला जाईल. पालकांना भेटण्याची वेळ सायंकाळी 17.30 ते 19.30 ठेवण्यात आली आहे. केंद्रामध्ये पालकां व्यतिरिक्त दुस-या कोणत्याही व्यक्तींना भेटण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

20. प्रशिक्षण कालावधीत झालेल्या शासकीय खर्चाची भरपाई प्रत्येक प्रशिक्षणार्थीने सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदावर दाखल होऊनच करावी आणि त्याचेशी एकनिष्ठ रहावे.

21. केंद्रामध्ये प्रशिक्षणार्थींना कोर्सबाबत वाटप करण्यात येणारी पुस्तके गहाळ/हरविला असता प्रशिक्षणार्थींना वाटप करण्यात आलेल्या पुस्तकावरती नमूद लेखकाचे पुस्तके बाजारातून खरेदी करुन जमा करावे त्या बदल्यात त्याची किंमत स्विकारली जाणार नाही किंवा दुस-या लेखकाचे पुस्तके जमा करुन घेतले जाणार नाही. तसेच वाटप करण्यात आलेल्या पुस्तकां वरती पेन्सील अथवा पेनाने कोणाचे नांव अथवा कोणत्याही प्रकारचे लिखाण करण्यास सक्त मनाई आहे. कोर्स संपल्यानंतर पुस्तके जर फाटली असतील तर ती चिकटवून सुव्यवस्थित करुन जमा करण्यात यावीत.

22. प्रशिक्षणार्थींना कोणतेही किमती सामान आणण्यास सक्त मनाई आहे, जर ते सामन आत्यवश्यक असले तर त्या सामानाची जबाबदारी स्वत: त्या प्रशिक्षणार्थींची असेल. जसे सोन्याचे अभुषण, लॅपटॉप, महागाई मोबाईल इत्यादी.

23. प्रशिक्षणार्थींना या कोर्सच्या कालावधी मध्ये कोणते ही आमली पदार्थ सेवन करण्यास सक्त मनाई आहे. जसे बिडी,सिगारेट,तंबाकु अल्कोहोल युक्त पदार्थ, ड्रग्स इत्यादी वरील नियमांचे केंद्रामध्ये प्रवेश मिळाल्यानंतर पालन करणे बंधनकारक आहे.

24. जर असे सेवन करताना आढळल्यास त्या प्रशिक्षणार्थीला त्या कोर्स मधून कायम स्वरुपी काढण्यात येईल आणि नियमानुसार कडक कार्यवाही करण्यात येईल.

25. 90% हजेरी कोर्स पुर्ण करण्यासाठी आवश्यक आहे. या पेक्षा जास्त दिवस गैर हजर असणारे प्रशिक्षणार्थी कोर्स साठी अपात्र ठरवण्यात येतील.

**वरील सर्व नियम व अटी मला मान्य आहेत व मी त्यांचे व्यवस्थितरित्या पालन करण्याची ग्वाही देत आहे.**

**प्रशिक्षणार्थी स्वाक्षरी**______________________

<u>परिशिष्ट 'क'</u>

## <u>सोबत आणावयाचे कपडे, साहित्य, शैक्षणिक प्रमाणपत्रे आणि केंद्रातून दिले जाणारे साहित्य/सामान</u>

1. **<u>प्रशिक्षणार्थींनी स्वत:च्या वापरासाठी पुढील प्रमाणे सामान/साहित्य सोबत आणावेत.</u>** पांढरा फूल बाजु शर्ट – 2, पांढरी हाफ पँट-2, पांढरा कॅन्हवॉस/स्पोर्ट बुट- 2 जोडी, पांढरे बनियान-2, पांढरे टी शर्ट-2, पांढरे स्वेटर - 1, पांढरे मोजे-2 जोडी, फॉर्मल ब्लॅक लांब पँट-2, लेदर ब्लॅक शुज-1 जोडी, खाजगी ड्रेस जरुरीनुसार, मच्छरदाणी, आंघोळीचे सामान, सुटकेस, गुडनाईट मशीन व वडी, डिक्शनरी, 3 X 6 (कमीत कमी) ची एक लोखंडी कॉटवर गादीखाली अंथरण्यासाठी सतरंजी, पांढरा स्वेटर-1, ब्लँकेट-1, व जरुरी नुसार थंड / गरम कपडे आणि छत्री.

2. **<u>मुलींसाठी गणवेश.</u>** पांढ-या रंगाची सलवार/कमीज-2, पांढरे कॅन्हवॉस/स्पोर्ट बुट-2 जोडी, पांढरे मोजे-2 जोडी, पांढरा स्वेटर-1, ब्लँकेट-1 व जरुरी नुसार थंड / गरम कपडे आणि छत्री.

3. **<u>मुलां/मुलींसाठी लेखन साहित्य आणि प्रमाणपत्रे</u>** – पेन, पेन्सील, रजीस्टर, अे-4 साईजचे 50 कोरे पेपर, (छत्री/रेनकोट-पावसाचे कालावधीत प्रशिक्षण असल्यास), इयत्ता 10 वी ते पदवीपर्यंतची सर्व मुळ प्रमाणपत्रे व गुणपत्रीका व त्यांच्या छायाकिंत प्रत्येकी एक प्रत, नोंदणीकृत वैद्यकिय अधिका-याचे शारिरीक व मानसिक तंदुरुस्त असल्या बाबतचे प्रमाणपत्र **आणि केंद्रामध्ये सी.डी.एस. कोर्स मध्ये प्रवेश मिळण्यासाठी UPSC चा CDS परिक्षेचा अर्ज अपलोड केल्याची प्रिंटेड कॉपी इत्यादी कोर्ससाठी येतांना आवश्यक आहे.**

4. **<u>उमेदवारास वापरा करीता केंद्रातर्फे पुढील प्रमाणे सामान दिले जाईल.</u>** गादी-1, गादी खोळ-1, उशि-1, उशि खोळ-1, कॉट-1, चादर-1, बेडशिट-1, ताट-1, वाटया-2, ग्लास-1, इत्यादी.

परिशिष्ट 'ड'

## पालकांचे संमतीपत्र

मी माझा मुलगा/मुलगी/पाल्य ________________________________ यास छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये **दिनांक** 19 **जून** 2023 ते 01**सप्टेंबर** 2023 पर्यंत होणाऱ्या सी.डी.एस प्रशिक्षण वर्ग क्र. 61 मध्ये प्रवेश घेण्यासाठी संमती देत आहे आणि दिलेल्या परिशिष्ट ब मधील नियम व अटींचे पालन करण्याची जबाबदारी माझ्या पाल्याच्यी राहील.

पालकाची सही ________________

पालकाचे नांव ________________

मोबाईल नं.__________________

**प्रतिस्वाक्षरी**

**(सरपंच/उपसरपंच/नगरसेवक/बँक मॅनेजर/विशेष अधिकारी/राजपत्रित अधिकारी)**

परिशिष्ट 'इ'

# MEDICAL FITNESS CERTIFICATE

## (Nearest Civil Hospital/Govt Hospital)

Based on the assessment made in my clinic/Hospital/Nursing home, I Shri________________________________________(Doctor Name) believe that________________________________________on of Shri____________________________is fit to undergo 75 days training/coaching for CDS Course to be held at Pre Cadet Training Centre, **Nashik from 19 Jun 2023 to 01 Sep 2023.**

Date :

Place :

Signed by Registered Medical Practitioner

A.M.A.____________________

Regd No____________________

परिशिष्ट 'ई'

# BOND

Know all men by these presents that I ________________________________________

(Name of the candidate) of (Address________________________________________________________

_______________________________ am held and firmly bound unto **THE GOVERNMENT OF MAHARASHTRA ;** hereinafter called as (Government) which expression shall unless excluded by or repugnant to the context include his/her successors and assign in the sum of **Rs. 45,000/-** to be paid to Government for which payment , will and truly to made I bind myself, my heirs, executers, administrators, legal representative by this presents.

Dated this _______________day of ______________________________________

**WHERES** Shri __________________________________________(hereinafter called the candidate)

Has been selected by the panel of selections for. CDS Course to be conducted at Pre Cadet Training Centre Nashik Road,Nashik for a period of 75 **days** with effect from **19 Jun 2023 to 01 Sep 2023** on the condition that the candidate shall complete his training at the Training Centre.

AND WHEREAS **during the course of the training the Government has agreed to give to the candidate so selected facilities of free lodging and boarding.**

**NOW THIS BOND is considered to be valid if the candidate.**

**1. is diligent in the presentation of this training at the Training Centre and is faithful in the observance of the Rules and Regulations of the Training Centre and shall be of good conduct and attends the course regularly and while under training marks progress to the entire satisfaction of the Government.**
**2. does not leave the training without the permission of the Officer-in-Charge of the Pre-Cadet Training Centre.**
**3. shall, during the course of training, bear all medical and other charges on account of any treatment he /she may undergo for any injury or ailment of any kind.**
**4. before commencement of of his /her training at Training Centre shall apply for the CDSE /SSB Exam. In the Indian Army/ Navy /Air Force and if selected shall join the Defence Services of India forthwith, otherwise this bond shall remain in full force .**

**AND the candidate hereby agrees not to hold the Government liable and claim any compensation for any loss during the training at the Training Centre.**

And **in the event of the candidate committing a breach of any of the terms and conditions the whole amount of Rs.45,000/- or such less as may be found by the Government in Administrative Department. Government of Maharashtra to have been incurred on account of such training; the decision of the Government regarding which shall be final and binding and shall become forthwith payable by the said candidate on demand and the amount so payable shall without prejudice to the other remedies of the Government be recoverable from the candidate as arrears of land revenue.**

IN WITNESS WHERE OF **the said candidate has set his hand the day and the year first above written.**

**Shri.____________________________________________within named; candidate in presence of -**

**1) Name & Address of the Witness** ____________________________________________

**2) Name & Address of the Witness** ____________________________________________

**Signature of Candidates**

**VERIFICATION & COUNTERSIGNATURE**

The above information has been verified and found to be correct.

Place : **Signature of AZSWO/ZSWO**

Date : **with stamp**

**(For and on behalf of the Director Department of Sainik Welfare, Pune, Maharashtra)**

f:\pctc nashik\email 27 apr 2023 information ssb cds exam details year 2023\press notification and adv for all zswos for wide publicity\email19 may 2023 info for zswo for publicity letter cds 61.doc

2244

दुरध्वनी : २६३३२७६३
Email-dsw@mahasainik.com

सैनिक कल्याण विभाग
महाराष्ट्र राज्य "रायगड"
राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर
घोरपडी, पुणे-४११ ००१

क्रमांक : १९००८/सैकवि-१९

दि. 16 एप्रिल २०१०

प्रति,
**जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी**
**जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय**
**सर्व जिल्हे**

विषय : **छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र,नाशिक येथे चालणा-या सीडीएस प्रशिक्षण वर्गातील प्रशिक्षणार्थींची निवड जिल्हा सैनिक कल्याण कार्यालया मार्फत होणेबाबत**

१. उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांना कळविण्यात येते की छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक या संस्थेत चालविण्यात येणा-या कम्बाईन्ड डिफेन्स सर्व्हिस CDS व SSB प्रशिक्षण या प्रशिक्षण कोर्सच्या कालावधीमध्ये अनुक्रमे CDS कोर्स ७५ दिवसांचा एक या प्रमाणे वर्षातून दोन आणि SSB कोर्स १० दिवसांचा एक या प्रमाणे वर्षातून चार कोर्स असे सुधारित प्रशिक्षण वर्ग सन २०१०-११ या वर्षापासून चालविण्याबाबतचे कार्यक्रमास मान्यता देणेस विभागाचे पत्र क्रं १९००८/सैकवि १९ दिनांक १० फेब्रुवारी २०१०अन्वये शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे.

२. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र नाशिक येथे दिनांक १७ मे २०१० पासून सीडीएस कोर्स क्रमांक ४० आणि दिनांक ०२ नोव्हेंबर २०१० पासून सीडीएस कोर्स क्रमांक ४१ हे चालविण्यात येणार आहेत. या पूर्वी सीडीएस कोर्ससाठी प्रशिक्षणार्थींची निवड करणे करिता सदर कार्यालयातील कवायत प्रशिक्षक व शारिरिक प्रशिक्षण निदेशक यांना **निवडक जिल्हयांचे ठिकाणी** व स्थानिक वर्तमान पत्रामधून जाहिरात देवून प्रशिक्षणार्थींची निवड करणे साठी पाठविण्यात येत होते. परंतू महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांमधून त्यास प्रतिसाद मिळत नसल्याने आणि योग्य प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणासाठी केंद्रात उपलब्ध होत नसल्याने त्याचा परिणाम निकाल व्यवस्थीत न लागण्यावर होत आहे.

३. सबब उपरोक्त बाबींचा विचार करून आता असे निश्चित केले आहे की सन २०१०-११ पासून छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे चालविण्यात येणा-या प्रत्येक कम्बाईन्ड डिफेन्स सर्व्हिस (CDS) या प्रशिक्षण वर्गासाठी प्रत्येक जिल्हयातील जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी प्रशिक्षणार्थींची निवड करून निवड केलेल्या प्रशिक्षणार्थीस छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रात पाठविण्यात यावे. त्यामुळे कमी वेळात चांगले व योग्य असे प्रशिक्षणार्थी उपलब्ध होतील. तसेच प्रशिक्षणार्थीस निवड चाचणी साठी आपला जिल्हा सोडून दुस-या जिल्हयात जावे लागणार नाही. यामुळे प्रशिक्षणार्थींचे आर्थिक नुकसान देखील होणार नाही आणि निवड करण्यासाठी शासकिय **कर्मचा-यांवर शासनाचे प्रवासभत्त्या पोटी रक्कम देखील खर्च** होणार नाही. पर्यायाने शासन अनुदानात बचत होईल. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रात एका सीडीएस प्रशिक्षण वर्गासाठी ५० मुलांची राहण्याची, भोजनाची व प्रशिक्षणाची व्यवस्था आहे. सबब प्रत्येक जिल्हयातील जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी खालील प्रमाणे जिल्हानिहाय दिलेल्या उद्दीष्ठा नुसार आणि छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र नाशिक यांनी वेळो-वेळी दिलेल्या कार्यक्रमानुसार कम्बाईन्ड डिफेन्स सर्व्हिस CDS कोर्ससाठी प्रशिक्षणार्थींची निवड करून नाशिक येथे प्रशिक्षणासाठी पाठविणेबाबत दक्षता घेण्यात यावी :-

--2/..

| अ.क्र. | जि.सै.क.अधिकारी | प्रशिक्षणार्थी निवडीचे उद्दिष्ठ | अ.क्र. | जि.सै.क.अधिकारी | प्रशिक्षणार्थी निवडीचे उद्दिष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुंबई शहर | ०२ | १७. | औरंगाबाद | ०३ -1 |
| २. | मुंबई उपनगर | ०२ | १८. | जालना | ०१ |
| ३. | ठाणे | ०२ | १९. | उस्मानाबाद | ०१ |
| ४. | रायगड | ०१ | २०. | लातूर | ०२ |
| ५. | रत्नागिरी | ०१ | २१. | नांदेड | ०२ |
| ६. | सिंधुदुर्ग | ०१ | २२. | बीड | ०२ |
| ७. | पुणे | ०४ — 2 | २३. | परभणी | ०१ |
| ८. | सातारा | ०४ — 2 | २४. | अमरावती | ०२ |
| ९. | सोलापूर | ०२ | २५. | बुलढाणा | ०१ |
| १० | सांगली | ०२ | २६. | वर्धा | ०१ |
| ११. | कोल्हापूर | ०४ — 2 | २७. | अकोला | ०२ |
| १२. | नाशिक | ०३ | २८. | वाशिम | ०१ |
| १३. | धुळे | ०१ | २९. | यवतमाळ/हिंगोली | ०१ |
| १४. | जळगाव | ०२ | ३०. | नागपूर | ०३ — 1 |
| १५. | अहमदनगर | ०३ — 1 | ३१. | चंद्रपूर/भंडारा | ०१ |
| १६. | नंदुरबार | ०१ | ३२. | गोंदिया/गडचिरोली | ०१ |
| | **एकूण** | **३५** | | **एकूण** | **२५** |

४. उपरोक्त प्रमाणे प्रत्येक जिल्हयासाठी दिलेले प्रशिक्षणार्थी निवडीचे उद्दीष्ट हे एका प्रशिक्षण वर्गा साठी आहे. प्रत्येक जिल्हयातील जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी चांगल्या प्रशिक्षणार्थींची निवड केल्यास निश्चितच सैन्यदलात अधिकारी पदावर महाराष्ट्रातील नवयुवकांची संख्या जास्तीत जास्त प्रमाणात होईल आणि पर्यायाने त्या जिल्हयाचा मान देखील उंचावेल.

५. सबब उपरोक्त परिच्छेद २ ते ४ मध्ये नमूद केलेप्रमाणे प्रत्येक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचेवर कम्बाईन्ड डिफेन्स सर्व्हिस या प्रशिक्षण कोर्ससाठी योग्य असे प्रशिक्षणार्थी निवडीची जबाबदारी **मा. संचालकांचे मान्यतेने** सोपविण्यात येत असून निवड झालेल्या मुलांची संख्या कमी-जास्त होत असल्यास कमीत कमी आठ दिवस अगोदर छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रास अवगत करण्यात यावे. तसेच सदर प्रशिक्षण कोर्ससाठी प्रशिक्षणार्थी निवडीबाबतची संपूर्ण माहिती छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्राकडून अवगत करून घेण्यात यावी.

मा. संचालकांचे मान्यतेने
(टिप्पणी क्र. 09 ... दि. 09/4/2010)

**उपसंचालक(सैनिकीकरण)**
**संचालकांकरिता**

**मा. संचालकांचे मान्यतेने**

**प्रत:-**

प्रभारी अधिकारी
छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र
महसूल आयुक्त कार्यालय परिसर
वर्ग-२ च्या क्वार्टर, नाशिक रोड
नाशिक - ४२२ १०१
- आपले पत्र क्र.२५२९/छाप्रके-१ दि.०५/०४/२०१०चे अनुषंगानेआपणास कळविण्यात येते की प्रशिक्षण कोर्ससाठी प्रशिक्षणार्थी निवडीबाबतची संपूर्ण माहिती सर्व जिल्हयांना तात्काळ कळविण्यात यावी.तसेच याबाबतची प्रसिध्दी आपले स्तरावरून वेळोवेळी देण्यात यावी.

**मा. अवर सचिव,महाराष्ट्र शासन** - शासनाचे माहितीस्तव सविनय सादर.
**सामान्य प्रशासन विभाग,(कार्यासन -२८), मंत्रालय,**
**मुंबई -४०० ०३२**